गोपनीय
व्यवस्थापन परिषद

मसुदा
क्र. ४ / २०१८–१९

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा **सोमवार, दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता** सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली. सभेमध्ये खालील सदस्य उपस्थित होते :–

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | — अध्यक्ष |
| २. | डॉ. रविंद्र कुलकर्णी (प्र–कुलगुरू) | — सदस्य |
| ३. | श्री. बि.एन. जगताप | — सदस्य |
| ४. | श्री. दिपककुमार मुकादम | — सदस्य |
| ५. | डॉ. मुरलीधर कु–हाडे | — सदस्य |
| ६. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | — सदस्य |
| ७. | प्रा. डॉ.गौतम गवळी | — सदस्य |
| ८. | डॉ. अजय भामरे | — सदस्य |
| ९. | डॉ. महादप्पा गोंडा | — सदस्य |
| १०. | डॉ. वैभव नरवडे | — सदस्य |
| ११. | डॉ. रविकांत सांगुर्डे | — सदस्य |
| १२. | श्री. निल हेळेकर | — सदस्य |
| १३. | डॉ. सुभाष वाघमारे | — सदस्य |
| १४. | श्री. प्रदीप सावंत | — सदस्य |
| १५. | श्री. राजन कोळंबेकर | — सदस्य |
| १६. | श्री. प्रमोद नाईक, प्रतिनिधी (सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण) | — सदस्य |
| १७. | डॉ. सुनिल भिरूड (प्रभारी कुलसचिव) | — सदस्य सचिव |
| १८. | डॉ. संजय शाह (प्र. वित्त व लेखा अधिकारी) | — निमंत्रित |
| १९. | डॉ. अर्जुन घाटुळे (प्र.संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | — निमंत्रित |

- **स्वागत** :— प्र—कुलगुरूंनी प्रभारी कुलसचिवांचा थोडक्यात परिचय देऊन स्वागत केले व कुलगुरूंनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर प्र—कुलसचिवांनी स्वतःच्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

- **अभिनंदन** :- प्रभारी कुलसचिवांनी अधिसभेमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन केले. संशोधन, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाचा लाभ विद्यापीठाला नक्कीच होईल, असे प्र—कुलसचिव म्हणाले. कुलगुरूंनी सर्व सन्माननीय सदस्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व हार्दिक स्वागत केले.

विविध आव्हाने सर्वांनी एकत्रितरित्या स्विकारून पुढील पाच वर्ष एकत्रितपणे चांगले काम करू या, असे आवाहन कुलगुरूंनी केले व सर्वांचे आभार मानले.

**श्रध्दांजली –**

### कोकण कृषी विद्यापीठ कर्मचारी

कोकण कृषी विद्यापीठातील ३३ कर्मचारी यांचे आंबेनळी घाटात भीषण अपघाताने दि २८ जुलै, २०१८ रोजी निधन झाले.

### श्री. आर. के. धवन

माजी केंद्रीय मंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. आर.के. धवन यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

SKS

## श्रीमती. शांताबाई काटे

ज्येष्ठ तमाशा कलावंत श्रीमती. शांताबाई काटे यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९७ वर्षांच्या होत्या.

## श्री. शांताराम पवार

जेष्ठ चित्रकार श्री. शांतारम पवार यांचे वृध्दपकाळाने दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

## श्री. अनंत बजाज

सुप्रसिध्द उद्योगपती श्री. अनंत बजाज यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १० ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४१ वर्षांचे होते.

## मेजर. कौस्तुभ राणे

मेजर कौस्तुभ राणे यांना दहशतवादयांशी लढताना दि. १० ऑगस्ट, २०१८ रोजी वीरगती प्राप्त झाली. मृत्यूसमयी ते २९ वर्षांचे होते.

## पत्रकार स्वरूप पंडित

राज्यशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध आणि संरक्षण या विषयातील बिनीचे अभ्यासक पत्रकार स्वरूप पंडीत यांचे कर्करोगाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ३३ वर्षांचे होते.

## श्रीमती. जयश्री देशपांडे

अनाथ मुलांच्या संगोपनासाठी डोंबिवलीत गेल्या २५ वर्षांपासून चालविल्या जाणा—या जननी आशिष अनाथालयाच्या समुपदेशक श्रीमती. जयश्री देशपांडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १२ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५२ वर्षांच्या होत्या.

## श्री. व्ही.एस.नायपॉल

नोबेल सन्मानप्राप्त ज्येष्ठ लेखक श्री. व्ही.एस.नायपॉल यांचे दिर्घ आजाराने दिनांक १२ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

SKS

## श्री. सोमनाथ चटर्जी

लोकसभा माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साम्यवादी नेते श्री. सोमनाथ चटर्जी यांचे दिर्घ आजाराने दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

## श्री. जयवंत नाडकर्णी

ज्येष्ठ नाटयकर्मी श्री. जयवंत नाडकर्णी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

## श्री. अजित वाडेकर

माजी क्रिकेट कर्णधार श्री. अजित वाडेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

## श्री. अटल बिहारी वाजपेयी

माजी पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचे दिर्घ आजाराने दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

## प्रा. फक्रुदिद्न बेन्नूर

ज्येष्ठ लेखक प्रा. फक्रुदिद्न बेन्नूर यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

## केरळ दुर्घटना

केरळ येथे दि. १७ ऑगस्ट, २०१८ रोजी आलेल्या नैसर्गिक संकटांमुळे संपुर्ण केरळ राज्य हे जलमय झाल्याने तेथील निष्पाप लोकांची जिवीतहानी झाली, त्याबद्दल आपण श्रध्दांजली अर्पण करू.

## श्री.मनिशंकर कवथे

मुंबई महापालिकेचे माजी नगरसेवक श्री. मनिशंकर कवथे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले मृत्यू समयी ते ९१ वर्षाचे होते.

SKS

## श्री. गुरूदास कामत

मुंबई कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री श्री. गुरूदास कामत यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २२ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

## श्री. कुलदिप नय्यर

प्रख्यात लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. कुलदिप नय्यर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते.

## श्री. विजय चव्हाण

ज्येष्ठ अभिनेते श्री. विजय चव्हाण यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

## जैन मुनी तरूणसागर

कडव्या प्रवचनांद्वारे समाजप्रबोधन करण्यात मोलाची कामगिरी बजावलेले, प्रसिध्द जैन मुनी तरूणसागर महाराज यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक ०१ स्पटेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५१ वर्षांचे होते.

## श्रीमती. शुभांगी जोशी

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. शुभांगी जोशी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या.

वरील सर्व व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून दिवंगताना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**बाब क्र.१** **दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, ९ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मंजूर करण्यात आले :-

१) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, १२ वी ओळीतील "be accepted" नंतर " subject to no dues certificates from Affillation Section" असे वाचावे.

२) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, १६ व्या ओळीतील "within a month" नंतर " persmisson for shifting be given after confirmation of payment of all dues,." असे वाचावे.

३) पान क्र. ५ मधील बाब क्र. ४, २४ व्या ओळीतील "Dr. Jorge Jose" च्या ऐवजी " Dr. Jose Gorge " असे वाचावे.

*

इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित झाले :-

१) बिर्ला महाविद्यालयाचे नाव बदला संदर्भात No Dues Certificate 2011 पासून दिलेले आहे; तेव्हा बिर्ला महाविद्यालयाबाबत No Dues Certificate हे संलग्नता विभागाने महाविद्यालय स्थापन झालेल्या दिनांकापासून देण्यात यावे. AM (change)

*

२) मेसर्स जाधव व कंपनीच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क येणे बाकी आहे, त्यांच्या वसुली संदर्भात तात्काळ संलग्नता विभाग, कुलगुरू, कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करून व्यवस्थापन परिषदेच्या निणर्यानुसार त्वरीत पत्र पाठवावयाची कार्यवाही सुरू करावी. तसेच याबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त तक्रारींवर निर्णय घेण्याकरिता तसेच उर्वरित महाविद्यालयांच्याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत एक समिती गठीत करण्यात यावी व या प्रकरणाचे संपुर्ण पुनरावलोकन करून अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करावा. समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. Aff/FYA (KP)

SKS

३) ऑल इंडिया टेनिस कोर्ट (AITA) च्या सामंजस्य करार (एम.ओ.यू) च्या अनुषंगाने फी न देणे, अशा विविध तक्रारी श्री. प्रदिप सावंत यांनी मांडल्या. तसेच इतरही सामंजस्य करार (एम.ओ.यू) आहेत त्यांचे नुतनीकरण करावयाचे असल्यास त्याबाबत पुनरावलोकन करण्यासाठी समिती गठित करण्यात यावी. समिती सदस्यांचे नाव सूचविण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

४) Mumbai School of Economics & Public Policy यांचे विविध करार झाले त्याबाबत गठीत समितीने दिलेल्या अहवालाप्रमाणे कायदेशीर तपासणी करून घेण्यात यावी. यासंदर्भात विद्यापीठावर कुठलाही आर्थिक भार येणार नाही असे कलम करारात अंतर्भुत करण्यात यावेत. तसेच कराराअन्वये काही मतभेद झाल्यास लवादाचे (आरबिट्रेशन) स्थान मुंबई असावे.

**बाब क्र.२ — १४ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, १४ जुलै, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**बाब क्र.३ — दिनांक २५ एप्रिल, २०१८ व २३ मे, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल सादर.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, दिनांक २५ एप्रिल, २०१८ व २३ मे, २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील ठराव पारीत झाले :-

१) व्यवस्थापन परिषदेच्या दि. २५/०४/२०१८ बाब क्र.४ बाबत पारीत झालेल्या ठरावावर समितीच्या अहवालानुसार किती शिफारशींवर अंमलबजावणी केली, याबाबत माहिती देण्यात यावी.

२) अस्थाई सुरक्षा रक्षकांना व्यवस्थापन परिषदेच्या १८.०२.२०१४ नुसार देण्यात येणारा अतिरिक्त भत्ता व २५.०४.२०१८ बाब क्र.९ नुसार गणवेश व विविध सुरक्षा रक्षकांच्या

वेतनातील फरक यावर निर्णय घेण्याकरिता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. समितीचा निर्णय व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा, असेही ठरले.

३) अस्थाई सुरक्षा रक्षकांच्या बाबतीतील व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावर कार्यवाही का केली जात नाही, कार्यवाही न करण्यामागील जे-जे दोषी आहेत त्यावर निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना देण्यात यावे. समितीने सादर केलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा, असेही ठरले.

४) ३० ते ४० सुरक्षा रक्षक ज्यांची तीन ते चार महिन्यापूर्वी नियुक्ती केलेली आहे व ज्यांना रू. २२,६०० वेतन मिळते त्यांच्या सेवा पुन्हा न घेता त्यांच्या सेवा खंडीत करून जे सुरक्षा अधिकारी १० ते २० वर्षे काम करतात, त्यांना सेवेत घेण्यात यावे, असे तत्वत: मान्य करण्यात आले. तसेच या सुरक्षा रक्षकांच्या सेवा खंडीत करण्याअगोदर सर्व सुरक्षा रक्षकांचे सेवा नियम, नियुक्तीच्या शर्ती व अटी, या निर्णयामुळे होणाऱ्या कायदेशिर बाबी, न्यायालयातील प्रकरणे, मागील वेतन परतावा, विद्यापीठावर येणारा आर्थिक भार या सर्व बाबींचा अभ्यास करून त्यांना सेवेत घेण्याबाबत निर्णय घेण्याकरिता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

५) प्र-कुलगुरूंना त्यांचे निवासस्थान देण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.

**बाब क्र.४** **महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांनी विद्यापीठ फोर्ट विभागामध्ये सांयकाळी व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष (Lecture Rooms) उपलब्ध करून देण्याबाबत गठित करण्यात आलेल्या समितीचा अहवाल.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई यांना विद्यापीठ फोर्ट विभाग परिसरामध्ये सांयकाळी ४ ते ८ या कालावधीत व्याख्यान घेण्यासाठी व्याख्यान कक्ष तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याबाबत श्री. मुकादम व डॉ रश्मी ओझा यांनी दि. ११ जून, २०१८ रोजी सादर केलेला अहवाल मान्य करण्यात आला.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, प्रशासकीय स्तरावर व्याख्यान कक्ष देण्याबाबत व्यावसायिक दराने भाडे निश्चित करण्यात यावे व त्यानुसार भाडे-करार बनविण्यात यावा. delete

*

| | |
|---|---|
| बाब क्र.५ | **भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१८ करीता निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून एका सदस्याची नेमणूक करण्याबाबत.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१८ साठी निकषानुसार बक्षीस पात्र विद्यार्थ्याला सुवर्ण पदक देण्याकरिता समिती सदस्यांची निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेतील एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| बाब क्र.६ | **सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स व समकक्ष पदांना रु. ९३००-३४८०० ऐवजी रू. १५६००-३९१०० इतके वेतन बँड व ग्रेड वेतन ५४०० मिळणेसाठीचा प्रस्ताव.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स व समकक्ष पदांना रु. ९३००-३४८०० ऐवजी रू. १५६००-३९१०० इतके वेतन बँड व ग्रेड वेतन ५४०० मिळणेसाठीचा प्रस्ताव खालील माहितीसह सादर करण्यात यावा. |

Scholarship unit (EXAM sec)

Estab II/IV

१) याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल.

२) सदर कर्मचाऱ्यांची मुळ नियुक्ती कोणत्या पदावर झाली?

३) त्यानंतर झालेली नियुक्ती / पदोन्नती कोणत्या पदावर कधी कधी झाली, दिनांक व पदनाम, सेवा-पुस्तकातील नोंदीसहित.

४) सदर नियुक्ती ही पदोन्नतीने झाली की सरळसेवा भरतीने झाली?

५) नियुक्ती सरळसेवा भरती प्रक्रियेने करण्यात आली आहे का? नसल्यास सरळ सेवा भरतीने पद न भरल्याची कारणे.

६) एकाच संवर्गातून त्याच संवर्गात पदोन्नती देता येते का?

नियुक्ती करताना / भरती प्रक्रिया राबविण्यात आली का?

*

SKS

७) एका संवर्गामधून (वर्ग-३) मधून दुसऱ्या संर्वगात (वर्ग-१) मध्ये परस्पर पदोन्नती देता येते का? याबाबत नियम काय आहेत?

८) सदर निर्णय कधी झाले व तसा निर्णय घेण्यामागील कारणे.

९) सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर्स बरोबर दुसरी कोण-कोणती समकक्ष पदे आहेत?

१०) शासन स्तरावर अशी पदे आहेत का? असल्यास त्यांना देण्यात येणारे वेतन व त्या पदासाठी असलेले निकष, शैक्षणिक, अनुभव पात्रता देण्यात यावी. शासन स्तरावर सदर पदांवर नियुक्ती कशी करण्यात येते?

११) शासन निर्णयात 'इतर समकक्ष पदांना १५,६००-३९,१०० (GP.5400) देण्यात यावे असा' उल्लेख दिसत नाही. तशा अर्थाचा शासन निर्णय देण्यात यावा.

१२) प्रत्येक कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम सहित (सिस्टम ऑफिसर्स व इतर समकक्ष) सदरवेतन वाढ दिल्यास प्रत्येक वर्षी विद्यापीठावर येणारा आर्थिक भार किती असेल ? तसेच मागील दिनांकापासून (back dated) द्यावयाचे असल्यास किती आर्थिक भार विद्यापीठावर येईल?

१३) सदर १० पदांमधील ३ पदांचे वेतन १५,६०० - ३९,१०० व ग्रेड वेतन ५४०० कोणत्या आधारावर देण्यात आले?

बाब क्र.७ **सर्व विद्याशाखांतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाना क्रीडा निधी (Annual Sports Contribution) ठरविणे बाबत.**

Physical Education & Sports

ठराव असा ठराव करण्यात आला की, सर्व विद्या शाखातील संलग्नीत महाविद्यालयांना व मान्यता प्राप्त संस्थांना क्रिडा निधी (Annual Sport Contribution) ठरविण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क. क्रीडा समिती/१८ दि. ६ ऑगस्ट, २०१४ मध्ये अ.क. ४ ते ७ रद्द करून अ.क. १,२,३ मुद्यांचा समावेश करावा, तसेच प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे शारिरीक शिक्षण संचालक/ क्रिडा मार्गदर्शक यांची नेमणूक करण्यात यावी. अशी शिफारस मान्य करण्यात आली. त्या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थांना सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे.

KP

असाही ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालये/ संस्थांमधून क्रिडा निधी जमा झाल्याची विद्यार्थी संख्यानिहाय माहिती सादर करण्यात यावी.

*

SKS

| | |
|---|---|
| **बाब क्र.८** | **डॉ. एस. व्ही. रत्नपारखी, प्राध्यापक-नि-संचालक यांच्या सेवानिवृत्ती वयोमानाबाबत.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, डॉ. एस. व्ही. रत्नपारखी, प्राध्यापक-नि-संचालक यांची बाब न्यायप्रविष्ठ (Sub-judice)असल्यामुळे सदर बाब विभागाकडे परत पाठविण्यात यावी. |

TISS (UT)
Attes Direct modi

| | |
|---|---|
| **बाब क्र.९** | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (e) अन्वये "विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य यांच्या निवडीकरिता व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांची निवड समितीवर नामनिर्देशित" करण्याबाबत...** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १०५ (२) (e) विद्यापीठ सेवेमधील अधिकारी उदा. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य यांच्या निवडीकरिता व्यवस्थापन परिषदेने, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांची निवड समितीवर नामनिर्देशित करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |

TAAS (UT)

| | |
|---|---|
| **बाब क्र.१०** | **विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील /महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत.** |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ अधिकार मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांना मानधन देण्याच्या प्रस्तावावर सखोल चर्चा करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला तसेच अतिकालिक भत्ता व सुट्टीच्या दिवशी काम केल्याने बदली रजा ही देण्यात आली असल्याने सदर बाब <u>अमान्य</u> करण्यात आली. |
| | चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, निवडणुकीबाबत नविन कायद्यानुसार निवडणुक नोंदणी शुल्काची आकारणी केली नाही त्यामुळे विद्यापीठाचे झालेले आर्थिक नुकसान तसेच |

Election
KP

*



SKS

विविध अभ्यास मंडळाच्या निवडणुका घेण्यात आलेल्या अडचणी व या अनुषंगाने प्राप्त झालेली निवेदने याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी व परिनियमाच्या अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतची डॉ. नरवडे यांनी केलेल्या मागणीची नोंद घेण्यात आली.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, मानधन देण्याबाबतची बाब ही निवडणूक सुरू होण्याअगोदर आणावी.

**बाब क्र.११ विद्वत परिषदेच्या दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र.४.१३ व ४.१४ वर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.**

ठराव विद्वत परिषदेच्या दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र. ४.१३ व ४.१४ वर केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या.

**बाब क्र.१२ Expansion of Governing Council, National Centre for Nanoscience and Nanotechnology, from 7 members to 10 Members.**

ठराव It was resolved that for making governing council of National Center for Nano-science and Nano-technology more vibrant by including more experts and stake- holders permission for expansion of Governing Council from 7 members to 10 members , be granted.

**बाब क्र.१३ Nominating members of the Governing Council of National Centre for Nanosciences & Nanotechnology, University of Mumbai (NCNNUM)**

ठराव It was resolved that following two names (as per composition 3 and 4 of Governing Council ) as Members on the Governing Council of National Centre for Nano-sciences & Nano-technology, University of Mumbai be nominated by the Management Council.

1) Dr. Anil Kakodkar.
2) Dr. Ashok Kolaskar.

**बाब क्र.१४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४७ (३) (घ) आणि (ङ) (च) मधील तरतुदीनुसार परीक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये व्यवस्थापन परिषदेने अधिष्ठात्या व्यतिरिक्त दोन प्राचार्य व विद्यापीठ विभागातील एक प्राध्यापक आणि विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्या खेरीज संलग्न महाविद्यालयातील एक अध्यापक नामनिर्देशित करण्याबाबत.**

Election

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४७ (३) (घ) आणि (ङ) (च) मधील तरतुदीनुसार परीक्षा व मुल्यमापन मंडळामध्ये व्यवस्थापन परिषदेने अधिष्ठात्या व्यतिरिक्त दोन प्राचार्य व विद्यापीठ विभागातील एक प्राध्यापक आणि विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्या खेरीज संलग्न महाविद्यालयातील एक अध्यापक नामनिर्देशित करण्याबाबत कुलगुरूंना अधिकार प्रदान करण्यात आले.

श्री प्रदिप सावंत यांनी डॉ. तुषार देसाई यांचे नाव सुचविले.

श्री. सांगुर्डे यांनी डॉ. के. वाय. राजपूत, थोडामल सहानी महाविद्यालय व श्री. भामरे यांनी प्रा. नरवडे यांचे नाव सुचविले. सदर नावाचा नामनिर्देशन करताना विचार करण्यात यावा, असे ठरले.

*

**बाब क्र.१५ मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्याबाबत व इनक्युबेटी एन्ट्री व एक्सीट पॉलिसी आणि इनक्युबेशन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सेक्शन ८, कंपनी ॲक्ट (सुधारणा) २०१३ अन्वये गठीत करण्याबाबत.**

APD

ठराव श्री. प्रदीप सावंत यांनी मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्यात येणार याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन केले. असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठ इनक्युबेशन आणि इन्वोव्हेशन सेंटर स्थापन करण्यास व इनक्युबेटी एन्ट्री व एक्सीट पॉलिसीबाबत अधिष्ठाता मंडळाला नियमावली बनविन्यास मान्यता देण्यात आली.

असाही ठराव करण्यात आला की, इनक्युबेशन बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सेक्शन ८, कंपनी ॲक्ट (सुधारणा) २०१३ अतंर्गत गठीत करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, सदर सेंटर स्थापन करण्यासाठी सुरूवातीस रू. ५ कोटी रूपयांची तरतुद विद्यापीठाच्या निधी मधून करण्यात यावी. इनक्यूबेशन सेंटर हे सुरूवातीला मुंबईत स्थापन

करण्यात यावे व नंतर हळू-हळू रत्नागिरी व इतर उपकेंद्रात सुरू करण्यात यावे.

असाही ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ (मुंबई युनिव्हर्सिटी ॲल्युम्नी असोशिएशन) पुर्नजिवित करण्यात यावी व त्यांची इनक्युबेशन सेंटर बळकट करण्यासाठी मदत घ्यावी.

**बाब क्र.१६ मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी विभागाला शैक्षणिक स्वायत्तता सातत्य देणेबाबतचा प्रस्ताव.**

Eco APU

ठराव असाही ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दि. ८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीतील बाब क्र.७.१ अन्वये केलेल्या शिफारशी मान्य करण्यात येऊन मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसी या विभागाला सन २०१६-१७ ते २०२०-२१ चे शैक्षणिक स्वायत्ताबाबत सातत्य देण्यास मान्यता देण्यात आली.

बाब क्र.१७ **To nominate three members on the Board of Management of Mumbai School of Economics and Public Policy (Autonomous)**

Eco

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पब्लिक पॉलिसीच्या (स्वायत्ता), बोर्ड ऑफ मॅनेजमेंटवर तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

बाब क्र.१८ **Discussion and decision regarding cases of alleged plagiarism by the Management Council.**

Thesis

ठराव : असा ठराव करण्यात आला की, यू.जी.सी चे क्र.F.1-18/2010(CPP-II) दि. २३ जुलै, २०१८ चे नोटिफिकेशन स्विकारण्यात येऊन महाविद्यालयांना परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. तसेच विद्यापीठ स्तरावर त्यानुसार समिती गठीत करण्यात यावी आणि (सर्व प्रलंबित व) भविष्यात येणारी प्रकरणे सदर समितीसमोर योग्य त्या कार्यवाहीसाठी ठेवण्यात यावी. यू.जी.सी. नोटिफिकेशन प्रमाणे समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

KP

*

SKS

APD & Lokkala Academy

**बाब क्र.१९ मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी अंतर्गत असलेल्या शाहीर अमरशेख अध्यासनामार्फत लोकशाहीर पठ्ठेबापूराव कलादालन उभारणेबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी अंतर्गत असलेल्या शाहीर अमरशेख अध्यासनामार्फत लोकशाहीर पठ्ठेबापूराव कलादालन उभारणेबाबत प्रस्ताव शासनाकडून रक्कम रू. ५ कोटी अनुदानस्वरूपात प्राप्त झाल्यास व विद्यापीठावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही या अटींच्या अधीन राहून मान्य करण्यात यावा.

TAAS (UT)

**बाब क्र.२० दोन विद्यार्थीनींच्या तक्रारी संदर्भात डॉ. महेंद्र भवरे यांना WDC ने ५ वर्षांची शिक्षेची शिफारस केली होती मात्र याबाबत व्यवस्थापन परिषदेने एक वर्षाचीच शिफारस मान्य केली असल्याने सदर शिक्षेचा पूर्नविचार करण्याबाबत.**

KP

ठराव असा ठराव करण्यात आला की, दोन विद्यार्थीनींच्या तक्रारी संदर्भात डॉ. महेंद्र भवरे यांना व्यवस्थापन परिषदेच्या दि. ११/१२/२०१७ च्या बैठकीत बाब क्र. ८ अन्वये पारित झालेली १ वर्षाची शिक्षा रद्द करून या बाबत आय.सी.सी. (I.C.C) समितीने केलेली ५ वर्षांची शिक्षेची केलेली शिफारस मान्य करण्यात आली व सदर शिफारशींवर गंभीर दखल घेऊन कायदेशिर तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या प्रमुख व धोक्याच्या जागेवर महिला कर्मचारी व विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात यावे.

TAAS (UT)

**बाब क्र.२१ मुंबई विद्यापीठाच्या (Alkesh Dinesh Mody Institute for Financial & Management Studies) या संस्थेतील नियुक्त्याबाबत विद्यापीठाने नियुक्त केलेल्या डॉ. विजय पागे समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

ठराव सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, डॉ. एस. व्ही. रत्नपारखी, प्राध्यापक-नि-संचालक यांची बाब न्यायप्रविष्ठ (Sub-juidce) असल्यामुळे याबाबत वस्तुस्थिती व कायदेशीर बाबी तपासण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठित करण्यात यावी:-



SKS

१) डॉ. रश्मी ओझा (निमंत्रक)
२) श्री.दिपककुमार मुकादाम
३) श्री. निल हेळेकर

सदर समितीने पागे समिती अहवाल व मुद्दा क्र. ८ मधील बाबींचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यात यावा.

चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, प्राचार्य नारिंग्रेकर, जे.एम.पटेल महाविद्यालय यांचे प्रकरण सदर समितीने तपासून अहवाल सादर करण्यात यावा. प्राचार्य नारिंग्रेकर यांच्या प्रकरणात श्री. राजन कोळंबेकर यांचा समितीत समावेश करण्यात यावा.

**बाब क्र.२२** **MoU between Department of Applied Psychology and Counseling Centre, Mumbai University and INHS ASVINI under National Mental Health Programme, for M.Phill in Clinical Psychology.**

APD

ठराव It was relsolved that draft MoU between Department of Applied Psychology and Counseling Centre, Mumbai University and INHS ASVINI under National Mental Health Programme, for M.Phill in Clinical Psychology, be approved.

The said resolution is passed and confirmed.

**बाब क्र.२३** **For sanctioning of new panel of the University Advocate and for revising the rates of fees to be paid to the panel advocates.**

Legal cell

ठराव It was resolved that new panel of the University of Mumbai Advocates and revised structure of the rates of fees to be paid to the panel advocates, be approved subject to point No. 11 on the panel list as advocate Mahesh Shukla will be then holding dual responsibility as Legal Adviser and Advocate. The Vice-Chancellor be authorizesd to take decision on serial No. 11 of the panel.

It was also resolved that, yearly report be submitted with regard to fees paid to the advocates and number of cases won and lost.

It was also resolved that the fees be paid only to the advocates on record and not to their juniors.

बाब क्र.२४ **Appointing MMRDA as Special Planning Authority (SPA) for University of Mumbai.**

ठराव It was resolved that MMRDA be appointed as Special Planning Authority (SPA) for University of Mumbai and Vice Chancellor be authorized to do the correspondance with the respective authorities for the same. It was also decided to constitutue committee to prepare development plan for the Kalina Campus. The Vice-Chancellor is authorized to form the committee for the same. Person having knowledge of regional planning be appointed on the committee. The same committee shall work to resolve the pending matters at Government level .

**बैठकीत अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय :-**

बाब क्र.२५ **MOU to start Master's and Micro degree Programme in Data Science for its implementation in blended MOOC model w.e.f. academic year 2018-19.**

ठराव It was resolved that draft MOU to start Master's and Micro degree Programme in Data Science for its implementation in blended MOOC model w.e.f. academic year 2018-19, be approved. The Registrar will sign the MOU and Head of Department will sign as witnesee.

बाब क्र.२६ **शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६, दिनांक २३ जुलै, २०१८ रोजीचे राज्य शासकीय कर्मचा-यांना बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, कर्मचाऱ्यांना बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २५/सेवा-६, दिनांक २३ जुलै, २०१८ स्वीकारण्यात यावा.

बाबक्र.२७ **विद्यापीठातील गटविमा योजनेत समाविष्ट न होणा-या शिक्षकेत्तरकर्मचा-यांना वैद्यकीय भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव.**

ठराव सदर बाब अधिक माहितीसाठी परत पाठविण्यात यावी.

बाब क्र.२८ **विद्वत परिषदेच्या दिनांक ८ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सभेमध्ये केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, दि.०८/०९/२०१८ रोजी विद्वत परिषदेमध्ये बाब क्र.६.५, ७.२, ७.४, ७.५ अन्वये केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या.

असाही ठराव करण्यात आला की, बाब क्र.३.४ या अन्वये केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या; परंतु, संलग्नता विभागाकडून सदर अभ्यास क्रमांसाठी व महाविद्यालयातील इतर अभ्यासक्रमाकरिता कुठलेही संलग्नता शुल्क व इतर शुल्क बाकी नाही असे प्रमाणपत्र "No Dues Certificate" प्राप्त झाल्याशिवाय पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये व सदर माहिती व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी.

असाही ठराव करण्यात आला की, बाब क्र.३.६ अन्वये ज्या महाविद्यालयांबाबत संलग्नता विभागाचे "No dues Certificate" असेल त्याच महाविद्यालयांना वाढीव विद्यार्थी संख्या देण्याची परवानगी देण्यात यावी.

बाब क्र.७.४ वरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, आचार्य मराठे महाविद्यालयाने M.Sc. (Finance) अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावावर काय कार्यवाही केली याची माहिती व्यवस्थापनाच्या बैठकीत देण्यात यावी.

बाब क्र.७.५ वरील चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठ विभागातील अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत समिती गठीत करायची गरज आहे किंवा नाही याबाबतची माहिती कुलसचिवांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावी.

बाब क्र.२९ **Universtiy of Mumbai invites expression of interest (EOI) from the reputed firm of Chartered Accountant for the appointment of internal Auditor and Tax Consultant for the Financial Year 2018-19 and futher on yearly renewal on the basis of performance.**

ठराव It was resolved that the Firm of Chartered Accountant be appointed for Internal Audit and filing of return for Income Tax, TDS,GST etc. for the F.Y. 2018-19 and futher yearly renewal on the basis of performance. The firm, which will be appointed, must be well conversant with Income Tax Rules in respect to higher educational Institutions.

**बाब क्र.३०** **विद्यापीठास प्राप्त झालेल्या अनेक तक्रारीनुसार डॉ. बी.एल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दिलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्याबाबत.**

Special Cell

ठराव असा ठराव करण्यात आला की, भवन्स् महाविद्यालय चौपाटी, मुंबई येथील महाविद्यालयातील शिक्षकांना होणाऱ्या त्रासाबद्दल/ छळाबद्दल विद्यापीठास प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार डॉ. बी.एल. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल नेमक्या कोणत्या समिती समोर यायला पाहिजे किंवा महाविद्यालयाला कारणे दाखवा नोटीस देऊन व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवावा का, यांचा संपुर्ण अभ्यास करून कुलसचिवांनी नंतरच सदर बाब व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी.

FXA

**बाब क्र.३१** **वित्त व लेखा समितीच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दि. २३ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.

Enrolment

**बाब क्र.३२** **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष नावनोंदणी अर्ज स्विकारण्याबाबतच्या मान्यतेबाबत.**

ठराव सविस्तर व सकारात्मक चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, विविध महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०१८- १९ मधील प्रथम वर्ष नावनोंदणी अर्ज दि. २९ सप्टेंबर, २०१८ पर्यंत विनाविलंब शुल्क स्विकारण्यास परवानगी देण्यात आली.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, विधी अभ्यासक्रमासाठी सदर नावनोंदणी अर्ज दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत स्विकारण्याची परवानगी देण्यात आली.

चर्चेच्या अनुषंगाने असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील विभागात व संलग्न महाविद्यालय या ठिकाणी रिक्त जागा आहेत त्यांनाही प्रवेशासाठी दि.२९ सप्टेंबर, २०१८ पर्यंत प्रवेश घेण्यास विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली.

SKS

चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित करण्यात आले.

१) श्री. एस.टी. मोरे व इतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणासंदर्भात प्राधान्याने निर्णय घेण्यात यावा.

२) प्रा. नरवडे यांच्या सुचनेनुसार "सर्व महाविद्यालयांच्या शिक्षकांची ~~विषयानुसार सामाईक सेवा ज्येष्ठता~~ विषयाबाबत शिकविण्याच्या अनुभवानुसार यादी तयार करण्यात यावी" हे तत्वत: मान्य करण्यात आले ~~व प्रा. नरवडे यांनी सविस्तर लेखी प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करण्यात यावा, असे ठरले.~~

३) प्रा. नरवडे यांच्या "विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या आर्थिक/मनुष्यबळाचा योग्य वापर व कामाकाजात गती आणण्याकरिता शिक्षकांच्या One Time Approval" बाबत केलेली सुचना तत्वत: मान्य करण्यात आली व तसा लेखी प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करण्यात यावा व सदर बाब अधिष्ठाता मंडळापुढे ठेवण्यात यावी.

४) सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियुक्ती/मान्यतेबाबतच्या प्रस्तावावर शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागाने लवकर कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

५) ऑयडॉलच्या विद्यार्थ्यांचे निकाल अजून लागले नसल्याने त्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळणार नाही याचा विचार करून परिक्षा विभागाने निकाल जाहीर करण्यासाठी प्रक्रिया त्वरीत पार पाडण्यात यावी, असे ठरले.

६) ॲडमिशन मॉनिटरींग कमिटीबाबत सर्व अधिष्ठाता यांनी कार्यपध्दती विकसित करण्यात यावी. शिक्षक, प्राचार्य व पदवीधर मतदार संघ यांचे प्रतिनिधी यांचा ॲडमिशन मॉनिटरींग समितीवर समावेश करण्यात यावा. ॲडमिशन मॉनिटरींग समितीने प्रथम सत्राच्या परीक्षा होण्याच्या अगोदर सर्व महाविद्यालयांना भेट देण्यात यावी, असे ठरले.

७) पंतवैद्य यांनी दिलेल्या पारशी कॉलनीच्या जागेच्या प्रकारणामध्ये कुलसचिव, श्री. मुकादम, श्री. सावंत व विद्यापीठ अभियंता यांची समिती गठन करण्यात यावी.

८) मादाम कामा वसतीगृह सुरू करण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात यावी. मेस व होस्टेल शुल्क ठरवण्यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात यावी. EDU

९) ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर "pass-in-exemption" छापले आहे त्या विद्यार्थ्यांना सुधारित गुणपत्रिका छापून देण्याची कार्यवाही करावी. BOEE

१०) श्री. प्रदीप सावंत यांनी केलेल्या सुचनेनुसार कलिना कॅम्पस समिती, स्पोर्ट समिती, युथ फेस्टिव्हल समिती, गठीत करण्यात यावी, असे ठरले. मा. कुलगुरूंना समिती गठीत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. सदर समितीमध्ये प्राधिकरणात निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असावा. DSW Sports

मा. श्री.मुकादम यांनी खालील मुद्दे मांडले.

१) व्यवस्थापन परिषदेत एखादा निर्णय झाल्यावर त्यावर ठराविक कालावधीत प्रशासनाने कार्यवाही करावी; तसेच विविध प्राधिकरणातून कार्यवाही करण्यास उशिर होत असेल किंवा विभागातून कार्यवाही करण्यास उशिर होत असेल, तर त्या ठराविक कालावधीत काम पुर्ण झाले नाही तर काय कार्यवाही करण्यात येणार?

सर्व सदस्यांनी बैठकीत चांगल्या प्रकारे योगदान दिल्याबद्दल कुलसचिवांनी सर्वांचे आभार मानून अध्यक्ष्यांच्या संमतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव

SKS

प्र कुलगुरू

कुलगुरू



* सदर ठरावामध्ये दि ०६ ऑक्टोबर २०१८ च्या व्यवस्थापन परिषदेत दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

SKS